# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र. ४४४ - २०२३** **दिनांक २९/१२/२०२३**

## जबरी चोरी, घरफोडी करणाऱ्या चार गुन्हेगारांना अटक करुन ११ गुन्हे उघड
## वालीव पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटिकरण पथकाला यश

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक- २०/१२/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. ते दिनांक- २१/१२/२०२३ रोजी रात्री ०१.४५ वा. चे दरम्यान गोखीवरे, फादरवाडी, वसई पुर्व, जि. पालघर येथे फिर्यादी यांचे टेम्पोमधुन एकुण १३,५००/- रुपये किंमतीचे कॅटरसचे सामान कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केलेबाबत तक्रार दिली म्हणुन गु.र.क्र. ९२८/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपी नामे १) कल्पेश किसन शिंदे वय- २३ वर्ष, रा. शिवभिमनगर, नाईकपाडा वालीव वसई पुर्व, २) शमशुददीन ऊर्फ भाटी इकबाल खान वय- १८ वर्ष, रा. तुंगारेश्वर फाटा वसई पुर्व ३) अजय चितांमण आंधेर वय- २२ वर्ष, रा. जानकीपाडा, वसई पुर्व ४) राजाप्रसाद राजपत यादव वय- २० वर्ष, रा. गौतमनगर, वेलचीपाडा, तुंगार फाटा वसई पुर्व यांना ताब्यात घेवुन त्यांचकडे तपास केला असता त्यांचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झाल्याले सदर गुन्हता अटक करण्यात आली. अटक आरोपीत यांचेकडे वालीव पोलीस ठाणे गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांच्याकडे कौशल्याने तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील एकुण ११ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. **गुन्हयातील जबरी चोरी केलेले मोबाईल, दागिणे, रोख रक्कम व इतर मुददेमाल तसेच गुन्हयात वापरलेली मोटारसायकल असा एकुण रु. १ लाख ५५ हजार ५०० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

**-उघडकीस आलेले गुन्हे-**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | गु.र.क्र. ९२८/२०२३ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. (मुळ गुन्हा) |
| २. | वालीव | गु.र.क्र.९३१/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| ३. | वालीव | गु.र.क्र. ९३३/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| ४. | वालीव | गु.र.क्र. ९३४/२०२३ कलम ३९२,३४ ० भा.दं.वि. |
| ५. | वालीव | गु.र.क्र. ९३५/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| ६. | वालीव | गु.र.क्र. ९३६/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि. |
| ७. | वालीव | गु.र.क्र. ९३०/२०२३ कलम ३९२,३४ भा.दं.वि |
| ८. | वालीव | गु.र.क्र.८७६/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि. |
| ९. | वालीव | गु.र.क्र. ८६७/२०२३ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. |
| १०. | वालीव | गु.र.क्र. ८७८/२०२३ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. |
| ११. | वालीव | गु.र.क्र. ९२९/२०२३ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यदश, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा/मनोज मोरे,मुकेश पवार, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सुनिल चव्हाण, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं/विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.